सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी "सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम" योजनेकरिता निधी विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: विहिर-२०१६/प्र.क्र.१७/रोहयो-५**
१६ वा मजला, नविन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय मुबई-४०० ०३२.
तारीख : ३१ जुलै, २०१७.

वाचा :-

१) नियोजन विभाग (रोहयो) शासन निर्णय क्रमांक: विहीर-२०१६/प्र.क्र.३१/रोहयो-५ दिनांक ११ सप्टेंबर २०१६.
२) नियोजन विभाग (रोहयो) शासन निर्णय क्रमांक: विहिर-२०१६/ प्र.क्र.३१/रोहयो-५ दि.१८ नोव्हेंबर, २०१६
३) नियोजन विभाग (रोहयो) क्रमांक विहिर-२०१६/ प्र.क्र. ४ /रोहयो-५ दि. ०७ जानेवारी, २०१७.

**प्रस्तावना :**

नियोजन विभागाच्या वाचा येथील अ.क्र. १ मधील नमूद दिनांक ११ सप्टेंबर,२०१६ च्या शासन निर्णयान्वये नागपूर विभागातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नागपूर व गोंदिया या पाच जिल्ह्यांमध्ये ११,००० सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, वाचा मधील अ.क्र. २ येथील नमूद दिनांक १८ नोव्हेंबर,२०१६ च्या शासन निर्णयान्वये रु.२७५ कोटी इतका निधी विभागीय आयुक्त, नागपूर यांना मंजूर करुन वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला होता.

नागपूर विभागातील चंद्रपूर जिल्ह्याकडून त्यांना देण्यात आलेल्या ३००० विहीरींच्या लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्याने, त्यासाठी ३६१४ असा सुधारित लक्षांक वाढवून देण्याची विनंती प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने वाचा मधील अ.क्र. ३ येथील नमूद विभागाच्या दिनांक ७ जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील मूल व पोंभूर्णा तालुक्यातील लक्षांकापेक्षा पात्र असलेल्या एकूण ६१४ लाभार्थ्यांना सिंचन विहिरीचा लाभ देण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्याकरीता सुधारीत लक्षांक ३६१४ करण्यात आलेला आहे. चंद्रपूर जिल्ह्यास देण्यात आलेल्या ६१४ सिंचन विहीरींच्या वाढीव लक्षांकाचे अनुदान वितरीत करण्याची बाब तसेच यापूर्वी दि. १८ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रु. २७५ कोटी इतक्या निधीच्या ४% प्रशासकीय खर्चाची रक्कम विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय

क) चंद्रपूर जिल्ह्यासाठी नियोजन विभागाच्या (रोहयो) च्या दिनांक ११ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार देण्यात आलेल्या सिंचन विहीरींच्या लक्षांकात सुधारणा करुन अतिरिक्त ६१४ विहीरींचा लक्षांक देण्यात आल्याने, त्या विहीरी पूर्ण करण्यासाठी प्रती विहिर रु २.५० लक्ष प्रमाणे रु. १५३५

लक्ष (अक्षरी पंधरा कोटी पस्तीस लाख फक्त ) इतका निधी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये सदर शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, नागपूर यांना मंजूर करुन वितरीत करण्यात येत आहे.

ख) नियोजन विभाग (रोहयो) च्या दिनांक १८ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या रू. २७५०० लक्ष निधी व आता चंद्रपूर जिल्ह्यास देण्यात आलेल्या सिंचन विहीरींच्या वाढीव लक्षांकापोटी वितरीत करण्यात येणा-या रु.१५३५ लक्ष अशा एकूण रु.२९०३५ लक्ष इतक्या निधीच्या ४% प्रशासकीय खर्चाची रक्कम रु. ११६१.४० लक्ष (अक्षरी अकरा कोटी एकसष्ठ लाख चाळीस हजार फक्त) इतका निधी सदर शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, नागपूर यांना मंजूर करुन अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे.

२. उपरोक्त (क) व (ख) मधील अनुक्रमे रु. १५३५ लक्ष व रा. ११६१.४० लक्ष असे एकूण रु. २६९६.४० लक्ष (सव्वीस कोटी शाहाण्णव लाख चाळीस हजार फक्त ) इतका निधी विभागीय आयुक्त नागपूर यांना मंजूर करण्यात येत असून, सदरचा खर्च सन २०१७-१८ या चालू वित्तीय वर्षात मागणी क्रमांक ओ-३ मुख्य लेखाशिर्ष २५०५, ग्रामीण रोजगार हमी योजना व ०२, ग्रामीण रोजगार हमी योजना १०१, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना (०१) (०९) दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजना अंतर्गत विहिर तयार करणे (२५०५ ए ०४९) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)," या लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीत तरतूदींतून भागविण्यात यावा.

३. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात आला आहे. त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची विभागीय आयुक्त, नागपूर यांनी खातरजमा करावी. तसेच हा निधी अन्य उपाय योजनांसाठी व बाबींवर खर्च होणार नाही, याचीही विभागीय आयुक्त, नागपूर यांनी दक्षता घ्यावी.

४. ज्या प्रयोजनासाठी निधी वितरीत करण्यात आला आहे, याबाबतची जिल्हानिहाय प्रगतीची माहिती विभागीय आयुक्त, नागपूर यांनी या विभागाकडे दर पंधरा दिवसांनी खर्चाच्या अहवाला सोबत सादर करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेख / नोंदवह्या विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत करणा-या कार्यालयाच्या स्तरावर अद्ययावत ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे दर पंधरा दिवसांनी होणा-या प्रत्यक्ष खर्चाचे पत्रक अशा २ पंधरवडयाचे एकत्रीत खर्चाचे पत्रक पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत एकत्रितरित्या न चुकता सादर करावीत. दरमहा झालेल्या खर्चाची, महालेखापाल कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता नियंत्रण अधिका-यांनी घ्यावी विभागीय आयुक्त नागपूर यांनी उपरोक्त निधीचे हिशेब स्वतंत्ररित्या ठेवावेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

(डॉ. प्रमोद शिंदे)
उप सचिव (रोहयो)

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

३. मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.समिती प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मुख्य सचिव यांचे सहसचिव
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग
८. विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर.
९. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र २, नागपूर,
१०. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर,
११. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१२. सर्व उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (रोहयो)
१३. निवडनस्ती रोहयो-५